आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१३ ऑक्टोबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रेल्वे पोलीस दलातली पदं यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भरण्यात येतील, अशी रेल्वे मंत्र्यांची घोषणा

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना जारी/ भाजपाची पहिली उमेदवार यादी आज संध्याकाळी जाहीर होणार

- आयआरसीटीसी घोटाळ्यात राजद अध्यक्ष लालू प्रसाद यादव, त्यांच्या पत्नी राबडी देवी आणि मुलगा तेजस्वी यादव यांच्यावर दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयात आरोप निश्चित

- करुर चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी सीबीआयतर्फे करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**आणि**

- भारत आणि वेस्ट इंडीज क्रिकेट संघांदरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात फॉलो ऑन नंतर डाव सावरण्यात वेस्ट इंडिजला यश

**<><><><><>**

आरपीएफ अर्थात रेल्वे पोलीस दलातल्या पदांसाठी यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे भर्ती केली जाईल, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. गुजरातमध्ये वलसाड इथे रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी आरपीएफशी संबंधित विविध उपक्रमांचा प्रारंभ केला. रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांकडे आता अतिउच्च फ्रिक्वेंसी असलेली उपकरणं दिली जातील, तसंच त्यांच्या कार्यक्षमतेत

वाढ करण्यासाठी त्यांना प्रगत डिजिटल आणि ड्रोन प्रशिक्षण दिलं जाईल, अशी घोषणाही रेल्वे मंत्र्यांनी यावेळी केली....

**होल्ड- रेल्वेमंत्री**

कमी उत्पन्न असलेल्या गटांच्या कल्याणासाठी रेल्वे सेवा वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी अश्विनी वैष्णव यांनी केला. येत्या दिवाळी आणि छट पूजेसाठी रेल्वे १२ हजार विशेष गाड्या चालवणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात, २० जिल्ह्यांमधल्या १२२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला पाररंभ झाला असून त्याची मुदत २० ऑक्टोबर पर्यंत आहे. २१ ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल, तर २३ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. या टप्प्यासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

देशातल्या ८ विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची अधिसूचनाही आज जारी झाली. राजस्थान, झारखंड, पंजाब, तेलंगण, मिझोरम, आणि ओदिशा या ६ राज्यातल्या प्रत्येकी एका विधानसभा मतदारसंघात तसंच जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशातल्या दोन विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुका होणार असून त्यासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची पहिली उमेदवार यादी तयार झाली असून आज संध्याकाळ पर्यंत ती जाहीर होईल असं बिहार भाजपा प्रधेशाध्यक्ष डॉ. दिलीप जयस्वाल यांनी सांगितलं. ते आज पाटणा इथं पत्रकारपरिषदेत बोलत होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे इतर घटक पक्ष देखील

आज उमेदवार यादी जाहीर करतील असं जयस्वाल म्हणाले. प्रतिस्पर्धी महाआघाडीच्या जागवाटपाबाबत वाटाघाटी सुरु असून लौकरच काँग्रेसची यादी जाहीर होईल असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राजेश राम यांनी सांगितलं. तिकिटवाटपावर तोडगा निघाला असल्याचं राजद नेता संजय यादव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आयआरसीटीसी घोटाळ्यात राजदचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव, त्यांच्या पत्नी राबडी देवी, मुलगा तेजस्वी यादव यांच्यावर दिल्लीच्या राऊज एव्हेन्यू न्यायालयाने आरोप निश्चित केले आहेत. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी या तिघांसह अन्य आरोपींवर भ्रष्टाचार, गुन्हेगारी कट आणि फसवणुकीचे आरोप निश्चित केले आहेत.

रेल्वेमंत्री असताना लालू प्रसाद यादव हे रेल्वे मंत्री असताना त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबाने २००४ ते २००९ दरम्यान एका खासगी कंपनीला कंत्राट देण्यासाठी जमिनीच्या स्वरुपात लाच स्वीकारल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. तसंच, रांची आणि पुरी इथल्या दोन आयआरसीटीसी हॉटेल्सचं कंत्राट अवैध पद्धतीने सुजाता हॉटेल्स या कंपनीला चालवण्यासाठी दिल्याचा आरोपही यादव यांच्यावर आहे. त्या बदल्यात कोट्यवधी रुपये किमतीची जमीन पत्नी राबडी देवी आणि मुलगा तेजस्वी यांच्याशी संबंधित कंपनीला कमी मूल्याने हस्तांतरित करण्यात आल्याचंही सीबीआयने आपल्या आरोपात म्हटलं आहे.

**<><><><><>**

वाहतुकीच्या बहुस्तरीय जोडणीसाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री गतिशक्ती राष्ट्रीय योजनेला आज चार वर्षं पूर्ण होत आहेत. विविध आर्थिक क्षेत्रांना बहुस्तरीय वाहतूक जोडणी उपलब्ध व्हावी यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १३ ऑक्टोबर २०२१ ला या योजनेचं उद्घाटन केलं होतं. लोकांना प्रवास करणं सुलभ व्हावं, वस्तू आणि सेवांची वाहतूक विनासायास व्हावी तसंच प्रवासाचा वेळ कमी व्हावा हे

याचं उद्दिष्ट होतं. गतीशक्ती योजनेमुळे ५७ केंद्रीय मंत्रालयं तसंच राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना एकत्रित आणलं गेलं.

<><><><><>

प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता आणि राजकीय नेता विजय यांच्या करूर इथल्या जाहीर सभेत झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी सीबीआयमार्फत करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. तामिळनाडूत करूर इथं गेल्या २७ सप्टेंबरला विजय यांच्या तमिळगा वेत्री कळगम- TVK पक्षाच्या जाहीर सभेच्या ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणाची चौकशी विशेष तपास पथकाकडून करण्याचे आदेश मद्रास उच्च न्यायालयानं दिले होते. या आदेशाला TVK पक्षानं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठानं हे आदेश दिले. या तपासावर सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अजय रस्तोगी यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समितीनं देखरेख करावी, असे आदेशही खंडपीठानं दिले आहेत. या समितीत तामिळनाडूचे रहिवासी नसलेल्या २ आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश असावा, असंही सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलियाच्या सैन्यासोबत होणाऱ्या ऑस्ट्राहिंद २०२५ या युद्धसरावात सहभागी होण्यासाठी भारतीय सैन्याच्या १२० जवानांचं पथक ऑस्ट्रेलियात दाखल झालं आहे. हा सराव संरक्षण सहकार्य आणि परस्पर विश्वासाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने होत असल्याचं कॅनबेरा इथल्या भारतीय उच्चायुक्तालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. हा सराव खुल्या आणि निमवाळवंटी प्रदेशातल्या युद्धांवर केंद्रित असेल. या सरावात सैन्याचं नियोजन, सामरिक कवायती आणि विशेष शस्त्रास्त्र कौशल्य यांचा समावेश असेल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातलं

संरक्षण सहकार्य मजबूत करण्याच्या दृष्टीने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गेल्या आठवड्यात ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज आणि संरक्षण मंत्री रिचर्ड मार्ल्स यांच्याबरोबर बैठक घेतली होती.

**<><><><><>**

परराष्ट्र राज्यमंत्री किर्तीवर्धन सिंह, युगांडा इथं १५ आणि १६ ऑक्टोबरला होणाऱ्या अलिप्ततावादी चळवळ- **नाम** च्या १९ व्या मध्यवधी मंत्रीस्तरीय अधिवेशनात भारतीय प्रतिनिधीमंडळाचं नेतृत्व करणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार २०२४ ते २०२६ या कालावधीत नाम चं अध्यक्षपद युगांडाकडे आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सुरु असलेल्या भारत आणि वेस्ट इंडीज क्रिकेट संघांदरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज चौथ्या दिवसाचा खेळ सुरू आहे, फॉलोऑननंतर वेस्ट इंडिजने पहिल्या डावातील पिछाडी भरून काढत दुसऱ्या डावात आघाडी घेतली आहे. आज वेस्ट इंडिजनं कालच्या २ गडी बाद १७३ धावावरून आपला दुसरा डाव पुढे सुरू केला. शाई होप आणि जॉन कॅम्पबेल यांनी तिसऱ्या गड्यासाठी १७७ धावांची भागीदारी करत वेस्ट इंडिजला डावाच्या पराभवाच्या नामुष्कीतून बाहेर काढलं. शाई होप १०३ धावा करून बाद झाला तर कॅम्पबेलनं ११५ ची खेळी केली. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजच्या ७ बाद ३०३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापट्टणम मध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ३३० इतकी मोठी धावसंख्या उभारली.

**//<><><><><>//**